# चार शुभवर्तमाने येशूविषयी साक्ष देतात

## चार शुभवर्तमानांमधील सारखेपणा व वेगळेपणा समजून घ्या

मुलांना शिकविणाऱ्यांनी G2b हा अभ्यास वाचावा.

**प्रार्थनापूर्वक** देवाच्या वचनातून स्वत:ची तयारी करा.

**प्रार्थना:** ''पवित्र पित्या, तू आपल्या मुलाविषयी येशूबद्दल आम्हाला साक्ष दिलीस आणि आम्हाला चार शुभवर्तमाने दिलीस ती समजून घेण्यास, त्यांचे आज्ञापालन करण्यास आणि त्याविषयी इतरांना शिकविण्यास आम्हाला कृपा पुरव.''

### 1. पार्श्वभूमी

- प्राचीन काळापासून एका पेक्षा अनेक साक्षीदारांच्या साक्षी प्रमाण मानल्या आहेत. मोशेच्या नियमशास्त्रानुसार कायदेशीर चौकशीसाठी दोन किंवा तीन साक्षीदारांची आवश्यकता असते.
- येशूचे जीवन आणि शिकवण याविषयीच्या चार साक्षी पवित्र आत्मा आम्हाला देतो: मार्क, मत्तय, लूक आणि योहान हे चार शुभवर्तमानांचे संग्राहक व लेखक आहेत.
- चारही शुभवर्तमानांचे लेखक येशू पृथ्वीवर असतांना हयात होते. त्यांच्यापैकी तिघा जणांची येशूशी चांगली ओळख होती, तर लूकने येशूविषयीची वस्तुस्थिती तपासून पाहिली (लूक 1:1-3). अशा प्रकारे चार शुभवर्तमाने म्हणजे घटनांचा 'प्रत्यक्ष पुरावा' म्हणून बळकट असा आहे.
- सर्व म्हणजे चारही लेखकांनी आपआपल्या शुभवर्तमानामध्ये येशू विषयीचे काही सारखे वृत्तांत लिहिले आहेत आणि दुसऱ्याने वगळलेले काही वृत्तांत प्रत्येकाने घातलेले आहेत; असे असले तरी चारही शुभवर्तमाने एकच सत्य वृत्तांत सांगतात आणि त्यांच्यात एकवाक्यता आहे.
- पुढे काही शतकांनंतर अन्य धर्मांनी येशू विषयीचे वृत्तांत बदलण्याचा खटाटोप केला परंतु आपल्याला मुळच्या चार शुभवर्तमानांवर विश्वास ठेवता येतो.



17 व्या शतकातील प्रसिद्ध चित्र

**पाहा लूक** 1:1-4 मध्ये शुभवर्तमाने कोठून आली.

**पाठ करा** चार शुभवर्तमानातील प्रत्येक लेखकाचे नाव आणि व्यक्तिमत्वातील मुख्य लक्षण:

#### मार्क

- येशूला वधस्तंभावर खिळले तेव्हा मार्क हा तरुण पुरुष होता.
- यहूदी कुटुंबातील मार्कने येशूला पाहिले आणि प्रेषित पेत्राशी त्याची चांगली ओळख होती.
- नंतर त्याने प्रेषित पौलाबरोबर सेवा केली. बहुतेक करून त्याने आपले हे शुभवर्तमान इतरांपेक्षा आधीच लिहिले असावे.

- सर्वात छोटे खानी अशा ह्या शुभवर्तमानामध्ये बहुतकरून येशूने केलेली कार्ये व कृत्यांचा विस्ताराने तपशील दिलेला आहे. रोम मधील लोकांच्या दृष्टीने सत्ता सामर्थ्य याला फार महत्व होते आणि मार्कचे शुभवर्तमान वाचायला त्यांना विशेषेकरून आवडत असे.

**मत्तय**

- ''माझ्या मागे ये'' अशी येशूने हाक मारेपर्यंत मत्तय हा यहूदी धर्माचे काटेकोर पालन करणारा एक जकातदार होता.
- त्याने मार्कच्या शुभवर्तमानातील काही भागाचा उपयोग केला आणि त्यात त्याला वैयक्तिकरित्या माहीत असलेल्या वृत्तांताची भर घातली.
- यहूदी लोकांना अगदी चांगल्या प्रकारे समजतील अशा येशूविषयीच्या घटना व तपशील त्याने दिला आहे.

**लूक**

- लूक हा व्यवसायाने डॉक्टर होता. तो यहूदी नव्हता येशूचे मरण व पुनरूत्थानानंतर तो विश्वासणारा झाला.
- त्याने प्रेषित पौलाबरोबर प्रवास केला. पौल यहूदीया तुरूंगवासात असतांना लुकाने तेथील प्रवासात येशूला प्रत्यक्ष पाहणाऱ्या लोकांकडून माहिती गोळा केली.
- लुकाने येशू आणि त्याला भेटलेल्या लोकांच्या अनेक बारीक सारीक तपशिलांचे वर्णन केले आहे यावरून यहूदीया मधील प्रत्यक्षदर्शीचे म्हणणे त्याने अगदी काळजीपूर्वक ऐकले हे समजते.
- लुकने यहूदीतर लोकांना वाचायला आवडेल अशा अनेक ऐतिहासिक व वैद्यकिय वस्तुस्थितींचा समावेश आपल्या लिखाणात केला आहे.

**योहान**

- येशूची भेट होण्यापूर्वी योहान हा बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाचा शिष्य होता. तसेच येशूच्या अत्यंत भक्तिमान शिष्यांपैकी तो एक होता.
- योहान दीर्घायुषी जीवन जगला. त्याने मृत्यूपूर्वी आपले शुभवर्तमान लिहिले आणि त्यातून इतर शुभवर्तमानांनी वगळलेली माहिती पुरवली.
- सर्व प्रकारच्या ख्रिस्ती लोकांना वाचायला आवडतील अशी येशूची अनेक दीर्घ प्रवचने त्याने नमूद केली आहेत.

चार शुभवर्तमानांनी एकत्रितपणे येशूच्या जीवनातील महत्वाच्या घटना सादर केल्या आहेत. सोबत त्याच्या अनेक शिकवणी आज्ञा आणि अभिवचनेही आहेत.

- येशूला वधस्तंभावर कसे खिळले, त्याला कसे पुरण्यात आले आणि पुन्हा जिवंत होऊन अनेक साक्षीदारांना कसे दर्शन दिले याचा तपशील सर्व शुभवर्तमाने देतात.
- चार शुभवर्तमानांमधून वृत्तांत वाचणे आणि कथन करणे ह्या अत्यंत प्रभावी मार्गाने आम्हाला इतरांना सुवार्ता सांगता येते.

2. **तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करून येणाऱ्या आठवड्यातील कार्यक्रम आखा.**

**चर्चा करा** चार शुभवर्तमानांचे लेखक कोण कोण आहेत आणि त्यांच्या लिखाणात कोणता सारखेपणा व वेगळेपणा आहे.

- विश्वासणारे आणि विश्वास न ठेवणारे ह्यांच्या भेटी घ्या.
- सर्व चारही शुभवर्तमाने येशूला प्रत्यक्ष ओळखणाऱ्या लोकांचे खरे वृत्तांत सादर करतात, हे स्पष्ट करा.
- विश्वास न ठेवणाऱ्यांना वाचण्यासाठी एका शुभवर्तमानाची प्रत द्या.

- विश्वासणाऱ्यांना एक शुभवर्तमान वाचण्याचा आराखडा द्या.

### 3. तुमच्या सहकाऱ्याशी चर्चा करून येणाऱ्या उपासनासभेसाठी योजना आखा

मुलांना त्यांनी तयारी केलेली नाटिका सादर करण्यास आणि प्रश्न विचारण्याची संधी द्या.

**स्पष्ट करा** चार शुभवर्तमाने हा खरा इतिहास आहे; खोटी दैवते किंवा एखाद्याच्या स्वप्नातील गोष्टी सांगणाऱ्या अन्य धार्मिक पुस्तकांपेक्षा शुभवर्तमाने सर्वस्वी वेगळी आहेत.

**चार विश्वासणाऱ्यांना** मार्क, मत्तय, लूक आणि योहान यांचे प्रतिनिधित्व करण्यास सांगा. ते स्वत:ची ओळख करून देतील आणि भाग 1 मध्ये दिलेली त्यांच्याविषयीची माहिती स्पष्ट करून सांगतील.

**मार्क:** ''मी मार्क, पौल व बर्णबा यांच्याबरोबर मी पहिल्या सुवार्ताफेरीवर गेलो, पण भीती वाटल्याने अर्ध्यातूनच घरी आलो, याचा राग दीर्घकाळ पौलाच्या मनात होता, परंतु शेवटी त्याने मला क्षमा केली आणि माझी मदतही घेतली.''

**मत्तय:** ''मी प्रेषित मत्तय, मला लेवी असेही म्हणतात. मी रोमन लोकांसाठी कर गोळा करण्याचे काम करीत असे. त्यामुळे यहूदी लोकांना माझा राग येत असे. येशूच्या मागे जाईपर्यंत मी अत्यंत वाईट मित्रांच्या संगतीत होतो.''

**लूक:** ''मी डॉ. लूक पेशाने वैद्य बहुसंख्य ग्रीक लोकांप्रमाणे मलाही येशूने शिकविलेल्या गोष्टींचे मनन करणे आवडते. मी पौलाबरोबर अनेक सुवार्ता फेऱ्यांवर गेलो. आम्ही लोकांना येशूविषयी सांगितले आणि त्यांच्या नवीन मंडळ्या स्थापन केल्या त्यावेळी पवित्र आत्म्याने निरनिराळ्या देशातील लोकांचा पालट केल्याचे मी पाहिले आहे.

**योहान:** ''मी योहान बरोबर, येशूच्या रिकाम्या कबरेपाशी सर्वप्रथम येणारा पहिला शिष्य, रक्तसाक्षी न झालेला मी एकमेव शिष्य आहे. हद्दपारीचे का असेना पण येशूचा संदेश देण्यासाठी देवाने मला दीर्घायुष्य दिले''


शुभवर्तमानांमधील वृत्तांतामधून कशा प्रकारे साहाय्य मिळाले ते विश्वासणाऱ्यांनी मोठ्याने सर्वांना सांगावे.

प्रभुभोजनाची ओळख करून देण्यासाठी मत्तय 27:27-31 वाचा. येशूचे दु:खसहन ही आमच्या पातकांसाठी केलेली भरपाई होती हे स्पष्ट करा. त्याने दु:ख सोसले आणि तो आमच्यासाठी मरण पावला. प्रभुभोजनाचा विधी साजरा करतांना प्रत्येकवेळी आम्ही याची आठवण करतो.

पाठ करा योहान 8:31:32

लिंडींसफ्रेन गॉस्पेल्स नावाने ओळखली जाणारी 7 व्या शतकातील चित्रे:


मत्तय


मार्क


लूक


योहान

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net